**मोटार अपघात प्रकरण १३६/२०२५**
**लायकबी वि. जयकिर्तीमान**
**निशाणी क्रमांक – ११**

**<u>साक्षीदाराची पुढील सरतपासणी मार्फत त्यांचे विधीज्ञ श्री.एम.व्ही.माडगे यांच्यामार्फत शपथेवर सुरु</u>**

१. मी माझ्या साक्षीचे शपथपत्र् न्यायालयामध्ये दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे व लिहीलेला मजकूर बरोबर आहे. त्यातील मजकूर मी स्वतः वाचून पाहिलेला आहे. यादी निशाणी क्र.४ सोबत मी गुन्हयाच्या प्राथमीक अहवालाची सत्यप्रत दाखल केली आहे. ती निशाणी क्र.१२ वर आहे. माझ्या वडीलांच्या मृत्यूचे प्रमाणपत्र निशाणी क्र.१३ वर आहे. सर्व अर्जदारांच्या आधारकार्डच्या छायांकीत प्रती निशाणी क्र.१४ ते १८ वर आहेत. सहयाद्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल ची प्रमाणीत एम.एल.सी. निशाणी क्र.१९ वर आहे. विठ्ठल शिंदे यांच्या पोलीस जबाबाची प्रमाणीत प्रत निशाणी क्र.२० वर आहे. समीर महेबूब शेख यांच्या पोलीस जबाबाची प्रमाणीत प्रत निशाणी क्र.२१ वर आहे. किशन मन्ना राठोड यांच्या पोलीस जबाबाची प्रमाणीत प्रत निशाणी क्र.२२ वर आहे. मो.आझरोद्दीन दस्तगीर शेख यांच्या पोलीस जबाबाची प्रमाणीत प्रत निशाणी क्र.२३ वर आहे. साजोद्दीन दस्तगीर शेख यांच्या पोलीस जबाबाची प्रमाणीत प्रत निशाणी क्र.२४ वर आहे, लायकबी दस्तगीर शेख यांच्या पोलीस जबाबाची प्रमाणीत प्रत निशाणी क्र.२५ वर आहे. ऋषभ रविंद्र सुवर्ण यांच्या पोलीस जबाबाची प्रमाणीत प्रत निशाणी क्र.२६ वर आहे. दोषारोपपत्राची प्रमाणीत प्रत निशाणी क्र.२७ वर आहे. घटनास्थळ पंचनाम्याची प्रमाणीत प्रत निशाणी

क्र.२८ वर आहे. फॉर्म ए ए प्रमाणपत्र निशाणी क्र.२९ वर आहे. माझ्या वडीलांच्या मरणोत्तर पंचनाम्याची सत्यप्रत निशाणी क्र.३० वर आहे. माझ्या वडीलांच्या शवविच्छेदन अहवालाची प्रमाणीत प्रत निशाणी क्र.३१ वर आहे. अपघात करणा–या वाहनाच्या विश्लेषण अहवालाची प्रमाणीत प्रत निशाणी क्र.३२ वर आहे. प्रादेशीक परिवहन अधिकारी यांनी अपघात करणा–या वाहनाचे परीक्षण केल्याबद्दलच्या अहवालाची प्रमाणीत प्रत निशाणी क्र.३३ वर आहे. माझ्या वडीलांच्या उत्पन्नाबद्दल मी दिनांक १७.०२.२०२६ रोजी दस्तावेज दाखल केलेले आहेत.

**उलटतपासणी सामनेवाला क्र.१ व २ तर्फे त्यांचे अधिवक्ता श्री.प्रविण एन.कांबळे**

विनाजबाब आदेश पारीत. पक्षकार आणि अधिवक्ता वारंवार पुकारा केला असता गैरहजर, सबब उलटतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/–

दिनांक :– २५/०२/२०२६

(आर.बी.भागवत)
जिल्हा न्यायाधीश क्र.२ तथा
सदस्य मोटार अपघात प्रा.,लातूर